**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – मा. श्रीपाल सबनीस

दि. १ फेब्रुवारी २०२५

पुण्य नगरी

### मानवतेचे गीत गाण्याची गरज : डॉ. सबनीस



**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

जगाला अशांततेच्या धोक्यात टाकण्याचे काम साम्राज्यवादी व भांडवलशाही महासत्तांचे सुरू असून, जगातली मानवता भयभीत झाली आहे.या पार्श्वभूमीवर विश्वाच्या शांततेचा नकाशा तयार करायचा असेल तर भारताची सर्वधर्मीय परंपरा व मानव कल्याणाचा विचार एकत्र करून मानवतेचे गीत गाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत भारतीय स्वातंत्र्य व देशाचे भवितव्य या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गणेश धुमाळ, परिचय प्रा. प्रवीण कारले आणि आभार डॉ. उन्मेश जगताप यांनी मानले.

Pimpri Chinchwad Edition
Feb 04, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

केसरी

# मानवतेचे गीत गाण्याची गरज : डॉ. सबनीस

**राजगुरुनगर, (वार्ताहर):** जगाला अशांततेच्या धोक्यात टाकण्याचे काम साम्राज्यवादी व भांडवलशाही महासत्तांचे सुरू असून जगातली मानवता भयभीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर विश्वाच्या शांततेचा नकाशा तयार करायचा असेल तर भारताची सर्वधर्मीय परंपरा व मानव कल्याणाचा विचार एकत्र करून मानवतेचे गीत गाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.



खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय स्वातंत्र्य व देशाचे भवितव्य' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, के. आर. पाचारणे उपस्थित होते. डॉ. सबनीस म्हणाले, स्वातंत्र्याने माणसाला आत्मभान आणि माणूस म्हणून जगण्याची संधी दिली. सर्वधर्मांची एकात्मता स्वातंत्र्याला अपेक्षित आहे. मात्र जातीधर्मांत विभागलेला समाज पाहता ती एकवाक्यता दिसत नाही. समाजात दुर्बळ राष्ट्रभक्ती, मूल्यांचा ऱ्हास, महापुरुषांचा पराभव आणि सामाजिक परिस्थिती मूल्यभ्रष्ट होत चालली आहे. सध्याच्या काळात कोणताच राजकीय पक्ष समर्थ वाटत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नव्या पिढीने लोकशाही मजबूत करण्याची गरज आहे. स्वातंत्र्यापूर्वी महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर या महापुरुषांमध्ये वैचारिक मतभेद होते. परंतु देश म्हणून आपण एक आहोत हा संदेश त्यांनी दिला.

आजचे राजकीय पक्ष एकमेकांचे शत्रू असल्यासारखे वागतात हा लोकशाहीला धोका आहे. ते पुढे म्हणाले की अहिंसा हे संस्कृतीच्या विकासाचे विश्वात्मक सूत्र आहे आणि त्याचे अधिष्ठान गांधीवादात आहे. महापुरुषांच्या संस्कारांची, विचारांची पेरणी कुटुंबातून होणे गरजेचे असून पालकांचा अभ्यास नसेल तर मुलांचे भविष्य चांगले घडणार नाही. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ते हिंदूंचे स्वराज्य होते; हिंदुत्ववाद्यांचे नव्हे. इतिहास हा जातीयवादाचा बळी ठरला असून नव्या पिढीने जातीच्या अंगाने इतिहासाची मांडणी नाकारावी, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गणेश धुमाळ, परिचय प्रा. प्रवीण कारले यांनी केले. डॉ. उन्मेश जगताप यांनी आभार मानले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
05 Feb 2025 - Page 4

# मानवतेचे गीत गाण्याची गरज - डॉ. श्रीपाल सबनीस

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
जगाला अशांततेच्या धोक्यात टाकण्याचे काम साम्राज्यवादी व भांडवलशाही महासत्तांचे सुरू असून जगातली मानवता भयभीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर विश्वाच्या शांततेचा नकाशा तयार करायचा असेल तर भारताची सर्वधर्मीय परंपरा व मानव कल्याणाचा विचार एकत्र करून मानवतेचे गीत गाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय स्वातंत्र्य व देशाचे भवितव्य' या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सबनीस पुढे म्हणाले की स्वातंत्र्याने माणसाला आत्मभान आणि माणूस म्हणून जगण्याची संधी दिली. सर्वधर्मांची एकात्मता स्वातंत्र्याला अपेक्षित आहे. मात्र जातीधर्मात विभागलेला समाज पाहता ती एकवाक्यता दिसत नाही. समाजात दुर्मीळ राष्ट्रभक्ती, मूल्यांचा ऱ्हास, महापुरुषांचा पराभव आणि सामाजिक परिस्थिती मूल्यभ्रष्ट होत चालली आहे. सध्याच्या काळात कोणताच राजकीय पक्ष समर्थ वाटत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नव्या पिढीने लोकशाही मजबूत करण्याची गरज आहे. स्वातंत्र्यापूर्वी महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर या महापुरुषांमध्ये वैचारिक मतभेद होते. परंतु देश म्हणून आपण एक आहोत हा संदेश त्यांनी दिला. आजचे राजकीय पक्ष एकमेकांचे शत्रू असल्यासारखे वागतात हा लोकशाहीला धोका आहे. ते पुढे म्हणाले की अहिंसा हे संस्कृतीच्या विकासाचे विश्वात्मक सूत्र आहे आणि त्याचे अधिष्ठान गांधीवादात आहे. महापुरुषांच्या संस्कारांची, विचारांची पेरणी कुटुंबातून होणे गरजेचे असून पालकांचा अभ्यास नसेल तर मुलांचे भविष्य चांगले घडणार नाही. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ते हिंदूंचे स्वराज्य होते; हिंदुत्ववाद्यांचे नव्हे. इतिहास हा जातीयवादाचा बळी ठरला असून नव्या पिढीने जातीच्या अंगाने इतिहासाची मांडणी नाकारावी असे त्यांनी सांगितले.

सांस्कृतिक महाराष्ट्राचे पुण्य या राजगुरुनगरच्या भूमीला असून साहेबराव बुट्टेपाटील हे या मातीचे सुपुत्र व संतत्व महापुरुष होते असा गौरव त्यांनी केला. माणसाचे जीवन समृद्ध करण्यासाठी व्याख्यानमाला आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गणेश धुमाळ, परिचय प्रा. प्रवीण कारले आणि आभार डॉ. उन्मेश जगताप यांनी मानले.

लोकमत



डॉ. श्रीपाल सबनीस यांचा सन्मान करताना संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील

# मानवतेचे गीत गाण्याची गरज : श्रीपाल सबनीस

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर** : जगाला अशांततेच्या धोक्यात टाकण्याचे काम साम्राज्यवादी व भांडवलशाही महासत्तांचे सुरू असून, जगातली मानवता भयभीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर विश्वाच्या शांततेचा नकाशा तयार करायचा असेल तर भारताची सर्वधर्मीय परंपरा व मानव कल्याणाचा विचार एकत्र करून मानवतेचे गीत गाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय स्वातंत्र्य व देशाचे भवितव्य' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अॅड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच.एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सबनीस पुढे म्हणाले की, स्वातंत्र्याने माणसाला आत्मभान आणि माणूस म्हणून जगण्याची संधी दिली. सर्वधर्माची एकात्मता स्वातंत्र्याला अपेक्षित आहे. मात्र जातीधर्मात विभागलेला समाज पाहता ती एकवाक्यता दिसत नाही. समाजात दुर्मीळ राष्ट्रभक्ती, मूल्यांचा ऱ्हास, महापुरुषांचा पराभव आणि सामाजिक परिस्थिती मूल्यभ्रष्ट होत चालली आहे. सध्याच्या काळात कोणताच राजकीय पक्ष समर्थ वाटत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नव्या पिढीने लोकशाही मजबूत करण्याची गरज आहे. स्वातंत्र्यापूर्वी महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर या महापुरुषांमध्ये वैचारिक मतभेद होते. परंतु देश म्हणून आपण एक आहोत हा संदेश त्यांनी दिला. आजचे राजकीय पक्ष एकमेकांचे शत्रू असल्यासारखे वागतात हा लोकशाहीला धोका आहे.

## जीवन समृद्धीसाठी व्याख्यानमालेची गरज

अहिंसा हे संस्कृतीच्या विकासाचे विश्वात्मक सूत्र आहे आणि त्याचे अधिष्ठान गांधीवादात आहे. सांस्कृतिक महाराष्ट्राचे पुण्य या राजगुरुनगरच्या भूमीला असून, साहेबराव बुट्टेपाटील हे या मातीचे सुपुत्र व संतत्व महापुरुष होते. माणसाचे जीवन समृद्ध करण्यासाठी व्याख्यानमाला आवश्यक असल्याचे डॉ. श्रीपाल सबनीस यांनी सांगितले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Feb 05, 2025
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# मानवतेचे गीत गाण्याची गरज : डॉ. सबनीस

## राजगुरू महाविद्यालयात साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यान

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

जगाला अशांततेच्या धोक्यात टाकण्याचे काम साम्राज्यवादी व भांडवलशाही महासत्तांचे सुरू असून, जगातील मानवता भयभीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर विश्वाच्या शांततेचा नकाशा तयार करायचा असेल, तर भारताची सर्वधर्मीय परंपरा व मानवकल्याणाचा विचार एकत्र करून मानवतेचे गीत गाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय स्वातंत्र्य व देशाचे भवितव्य' या विषयावर डॉ. सबनीस बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित व्याख्यानमालेत डॉ. श्रीपाल सबनीस यांचा सन्मान करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.

डॉ. सबनीस म्हणाले, समाजात राष्ट्रभक्ती, मूल्यांचा ऱ्हास आणि सामाजिक परिस्थिती मूल्यभ्रष्ट होत चालली आहे. सध्याच्या काळात कोणताच राजकीय पक्ष समर्थ वाटत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नव्या पिढीने लोकशाही मजबूत करण्याची गरज आहे. महापुरुषांच्या संस्कारांची, विचारांची पेरणी कुटुंबातून होणे गरजेचे असून, पालकांचा अभ्यास नसेल, तर मुलांचे भविष्य चांगले घडणार नाही. इतिहास हा जातीयवादाचा बळी ठरला असून, नव्या पिढीने जातीच्या अंगाने इतिहासाची मांडणी नाकारावी, असे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ यांनी केले. परिचय प्रा. प्रवीण कारले यांनी करून दिला, तर डॉ. उन्मेश जगताप यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Feb 05, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

केसरी
: www.dailykesari.com
जिल्ह

# मानवतेचे गीत गाण्याची गरज : डॉ. सबनीस



**राजगुरुनगर, (वार्ताहर):** जगाला अशांततेच्या धोक्यात टाकण्याचे काम साम्राज्यवादी व भांडवलशाही महासत्तांचे सुरू असून जगातली मानवता भयभीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर विश्वाच्या शांततेचा नकाशा तयार करायचा असेल तर भारताची सर्वधर्मीय परंपरा व मानव कल्याणाचा विचार एकत्र करून मानवतेचे गीत गाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय स्वातंत्र्य व देशाचे भवितव्य' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, के. आर. पाचारणे उपस्थित होते. डॉ. सबनीस म्हणाले, स्वातंत्र्याने माणसाला आत्मभान आणि माणूस म्हणून जगण्याची संधी दिली. सर्वधर्मांची एकात्मता स्वातंत्र्याला अपेक्षित आहे. मात्र जातीधर्मात विभागलेला समाज पाहता ती एकवाक्यता दिसत नाही. समाजात दुर्मीळ राष्ट्रभक्ती, मूल्यांचा ऱ्हास, महापुरुषांचा पराभव आणि सामाजिक परिस्थिती मूल्यभ्रष्ट होत चालली आहे. सध्याच्या काळात कोणताच राजकीय पक्ष समर्थ वाटत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नव्या पिढीने लोकशाही मजबूत करण्याची गरज आहे. स्वातंत्र्यापूर्वी महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर या महापुरुषांमध्ये वैचारिक मतभेद होते. परंतु देश म्हणून आपण एक आहोत हा संदेश त्यांनी दिला.

आजचे राजकीय पक्ष एकमेकांचे शत्रू असल्यासारखे वागतात हा लोकशाहीला धोका आहे. ते पुढे म्हणाले की अहिंसा हे संस्कृतीच्या विकासाचे विश्वात्मक सूत्र आहे आणि त्याचे अधिष्ठान गांधीवादात आहे. महापुरुषांच्या संस्कारांची, विचारांची पेरणी कुटुंबातून होणे गरजेचे असून पालकांचा अभ्यास नसेल तर मुलांचे भविष्य चांगले घडणार नाही. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ते हिंदूंचे स्वराज्य होते; हिंदुत्ववाद्यांचे नव्हे. इतिहास हा जातीयवादाचा बळी ठरला असून नव्या पिढीने जातीच्या अंगाने इतिहासाची मांडणी नाकारावी, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गणेश धुमाळ, परिचय प्रा. प्रवीण कारले यांनी केले. डॉ. उन्मेश जगताप यांनी आभार मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**